# सोनगाव येथे मोफत दंतचिकित्सा शिबिर




दिंडोरी/प्रतिनिधी

तालुक्यातील जि.प.शाळा (भोर्याचापाडा) सोनगाव येथे 'स्वप्नपूर्ती 'एज्युकेशन व सोशल वेलफेअर सोसायटी नाशिक यांच्या वतीने मोफत दंतचिकीत्सा तपासणी व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले.

संस्थेच्या अध्यक्षा दंतचिकीत्सक डॉ.अनुराधा गाडेकर यांनी सर्व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची मौखिक तपासणी केली.प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना मौखिक आरोग्याचे महत्व, दात साफ करण्याची शास्त्रोक्त पद्धत,दुधाचे दात ,कायम दातांचे महत्व ,मौखिक आरोग्याचा शारिरीक आरोग्याशी असलेला संबंध,जंक-फूड ,दातांवर व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या शिबिरामध्ये संस्थेचे सचिव अनिरुद्ध पिंपळे,भार्गव गाडेकर आदि उपस्थित होते. शिबीर यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत कोठावदे,प्रविण वराडे व विनायक लांडगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

लोकमंथन Fri, 22 February 2019
https://www.readwhere.com/read/c/36983820

Scanned with Oken Scanner